ePaper

| वर्ष - 9 । अंक -117 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

www.mahaenews.com । रविवार, दि. 21 डिसेंबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## ज्येष्ठ काँग्रेस नेत्या आणि माजी मंत्री शालिनीताई पाटील यांचे निधन



### आतील पानांत


- सूर्यकुमारचे स्थान मात्र कायम!
- किशनला अखेर टीम इंडियाचं दार उघडलं
- घुसखोरांना पाठिशी घालत आहेत
- लेफ्टनंट कर्नल च्या घरी CBI ची धाड


**महापालिका रणधुमाळी** | अजितदादांची राष्ट्रवादी अन् ‘स्वबळाचा नारा’

# महायुतीत मिठाचा खडा?

## पुणे-पिंपरी व मुंबईत राष्ट्रवादीचा एकला चलो रेचा पवित्रा! चर्चेतील अडथळे वाढताहेत?



- महायुतीत राष्ट्रवादीला जागा वाटपाचा पेच; बैठका सुरू पण निकाल ठप्प
- पुणे-पिंपरीत स्वबळावर लढण्याच्या चर्चा वेगात
- 23-24 डिसेंबरला महापालिका समीकरणे उघड होण्याची शक्यता
- नगर परिषद निकालानंतर युतीच्या संकेतांची शक्यता

। पुणे । प्रतिनिधी ।
महाईन्यूज

**महापालिका निवडणुकीची धामधूम सुरु झाली आहे आणि राज्यात महायुतीचे घटक पक्ष अंतिम फेरीच्या चर्चेत मग्न असतानाच एक मोठा राजकीय सिग्नल ऐकू येतोय – अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (NCP-AP) आता अनेक महापालिकांमध्ये स्वबळावर लढण्याचा विचार करीत आहे. त्यामुळे महायुतीत पुन्हा मिठाचा खडा पडण्याची चिन्हे राजकीय वर्तुळात चर्चेत आहेत**

भाजप आणि एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेची महापालिकेत बरीच ठिकाणी समझोता राजकारण रंगात आलं आहे. शेवटच्या टप्प्यात जागा वाटप, जातीय-सामाजिक गणित, स्थानिक पातळीवरील दबावगटांची भूमिका या अनेक मुद्द्यांवरून युतीचा ताळमेळ जमवण्यासाठी बैठकींचा पाऊस सुरू आहे. पण या सगळ्या समीकरणांमध्ये अजितदादांची राष्ट्रवादी वारंवार अडथळ्यांना तोंड देत असल्याचं सूत्रांचं म्हणणं आहे. अनेक ठिकाणी राष्ट्रवादीला अपेक्षित जागा किंवा नेतृत्व स्थान मिळेल का, हा पेच कायम आहे.

### राष्ट्रवादीसमोर निर्माण झालेला पेच

भाजप–शिंदे सेनेसोबत युतीची प्राथमिक चर्चा असूनही राष्ट्रवादी नेत्यांना तिथे जागा, सत्ता भागीदारी आणि स्थानिक नेतृत्वाचा प्रश्न जास्त अडचणीचा ठरत आहे.

मुंबईत नवाब मलिक यांच्याविषयीचा मतभेद अजून मिटलेला नाही, तर पुण्यात भाजपने स्वतंत्र लढण्याचा सूर आधीच लावला आहे. त्यामुळे राष्ट्रवादीला कुठे सन्मान मिळेल? कुठे वाटणी होईल? हे स्पष्ट नसल्याने पक्षात नाराजी वाढत असल्याचे चित्र आहे.

### रात्री उशिरापर्यंत तासभर बैठक

सूत्रांनुसार उपमुख्यमंत्री अजित पवार, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यात रात्री जवळपास तासभर बैठक झाली. या बैठकीतील तांत्रिक तपशील बाहर आलेला नसला, तरी जागा वाटप, युती योग्य असेल अशा मतदारसंघांची यादी आणि काही महत्त्वाचे मतभेद यावर चर्चा झाल्याचे राजकीय संकेत आहेत.

महापुरुषांच्या मुद्द्यांवरून पार पडलेल्या नाराजीचे सावटही अजून मिटलेले नाही. शिवाय अजून एका मंत्र्याची विकेट पडल्याने राष्ट्रवादीमध्ये अंतर्गत अस्वस्थता वाढण्याची शक्यता वाढली आहे.

### कोणत्या महापालिकेत

### एकला चलो रे?

निवडणूक जवळ येत असतानाच राष्ट्रवादीने स्वबळाचा नारा देण्याची तयारी केली आहे. सूत्रांनुसार या महापालिकेत पक्ष स्वतंत्र लढण्याच्या तयारीत आहे –

**पुणे महानगरपालिका**
**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका**
**अमरावती महानगरपालिका**
**मुंबईतही स्वतंत्र लढण्याचे संकेत**

## स्वबळाचा नारा कशासाठी?

राजकारणात ‘शेवटची रात्र’ सर्वात निर्णायक ठरते. 23-24 डिसेंबरनंतर महापालिका युतीचं खऱ्या अर्थाने चित्र स्पष्ट होण्याची शक्यता आहे. भाजप-शिवसेना युती बहुतेक ठिकाणी होणारच, मात्र राष्ट्रवादी पक्षाने स्वबळावर जाण्याचा खेळ सुरू \केला तर सत्तासमीकरणात अनपेक्षित कलाटणी मिळू शकते. स्वबळाचा नारा फक्त दबाव टाकण्याची रणनीती आहे की खरी लढाईची तयारी? हा प्रश्न उत्तरांच्या प्रतिक्षेत आहे.

स्वबळावर जाण्याचा हा निर्णय पुढील काही दिवसांत अधिकृत करण्याची शक्यता आहे. तसेच युतीचे स्पष्ट चित्र नगर परिषद निवडणूक निकालानंतर निवडून येण्याची चिन्हे आहेत. 23-24 डिसेंबर हा महत्त्वाचा टप्पा मानला जातो.

### शरद पवारांच्या राष्ट्रवादीसोबत जाण्याचीही शक्यता?

राज्यात राष्ट्रवादीचे दोन गट – अजित पवार गट (NCP–AP) आणि शरद पवार गट (NCP–SP) – महापालिका पातळीवर दूर असले तरी स्थानिक पातळीवर गठबंधनाची शक्यता चर्चेत आहे. शरद पवारांच्या राष्ट्रवादीसोबत आघाडीबाबत स्थानिक नेत्यांना स्वातंत्र्य देण्याचा सूर अजितदादांच्या बैठकीत उमटल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. त्यामुळे पुणे-पिंपरीत दोन्ही गट एकत्र लढू शकतात अशी चर्चा जोर धरतेय. म्हणजेच एका हातात महायुती आणि दुसऱ्या हातात स्थानिक पातळीवरील स्वबळाचा निर्णय अशी राष्ट्रवादीची ‘दुहेरी रणनीती’ दिसून येते आहे.

### काय चित्र दिसतंय?

पारंपरिक राष्ट्रवादी कार्यकर्त्यांमध्ये अस्वस्थता असली तरी आगामी निवडणुकीचे गणित स्पष्ट आहे . स्वबळावर लढून स्थानिक संघटना मजबूत करणे, महायुतीमध्ये प्रतिष्ठेचा भाग मिळवणे, भाजप-शिंदे यांच्यावर दबाव टाकणे, स्थानिक पातळीवर शरद पवार गटासोबत सौहार्दाचे राजकारण, असा संयुक्त खेळ करून राष्ट्रवादी स्वतःला महापालिका समीकरणात ‘किंगमेकर’ किंवा ‘स्वतंत्र शक्ती’ म्हणून उभं करण्याचा प्रयत्न करत आहे.

प्रभाग "रचना जैसे थे" प्रदर्शनाच्या पहिल्याच दिवशी तुफान गर्दी !

# भोसरीत लांडगे विरुद्ध लांडगे!

। पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**भोसरी प्रभाग क्रमांक सहा मध्ये पूर्वी एकत्र असणारे मात्र सध्या वेगवेगळ्या पक्षात प्रवेश केलेले रवी लांडगे आणि राजेंद्र लांडगे यांच्या पॅनल मध्ये जोरदार फाईट होणार आहे. भारतीय जनता पार्टीचे नेते दिवंगत अंकुश लांडगे यांचे पुतणे रवी लांडगे आणि विद्यमान आमदार महेश लांडगे (MAHESH LANDGE) यांचे कट्टर समर्थक राजेंद्र लांडगे यांच्या पॅनल असणार आहे. या प्रभागात राष्ट्रवादी, शिवसेना नेते एकत्र लढतील असे चित्र दिसत आहे. 2017 च्या निवडणुकीप्रमाणे प्रभाग "रचना जैसे थे" आहे. प्रभाग क्रमांक 6 मध्ये कोणताही बदल नाही.**

## भोसरीत जाळ अन् धूर संगटच निघणार




ज्याअर्थी 2017 प्रमाणे प्रभाग निश्चित झाले आहेत. त्यासाठी 2011 ची जनगणना गृहीत धरण्यात आली आहे. तत्कालीन जनगणनेनुसार, प्रभागाची लोकसंख्या 53 हजार 120 इतकी दर्शवण्यात आली आहे. त्यापैकी 4 हजार 700 इतकी अनुसूचित जाती आणि 1 हजार 800 इतकी अनुसूचित जमातीची लोकसंख्या आहे.लोकसंख्येच्या प्रमाणानुसार, 2017 प्रभाग मध्ये शहरात भाजपाची मोठी लाट होती. नगरसेवक निवडून आले होते. या प्रभागातून भाजपाचे चारही प्रभागातील अ गटातून भाजपाच्या यशोदा बोईनवाड यांनी 12 हजार 628 मते मिळवत, राष्ट्रवादीच्या आशा सुपे यांचा पराभव केला होता.ब- गटातून भाजपच्या तिकीटावर लढलेल्या सारिका लांडगे यांनी 9 हजार 240 मते मिळवली होती. त्यांनी राष्ट्रवादीच्या सुनिता गवळी आणि शिवसेनेच्या करिष्मा बढे यांचा पराभव केला होता. विद्यमान आमदार महेश लांडगे यांच्या त्यावेळी समर्थक असलेल्या सारिका लांडगे यांनी विधानसभा निवडणूक 2024 पूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. त्यानंतर विधानसभा निवडणूक 2024 मध्ये राष्ट्रवादी शरद पवार (SHARAD PAWAR) गटात आणि त्यानंतर आता त्या राष्ट्रवादी अजित पवार गटात आहेत. क गटातून तत्कालीन भाजपाचे रवि लांडगे या प्रभागातून बिनविरोध निवडून आले होते. त्यावेळी राष्ट्रीय खेळाडू योगेश लांडगे यांनी माघार घेतली आणि रवि यांचा बिनविरोधचा मार्ग मोकळा झाला. मात्र, आमदार महेश लांडगे यांचे समर्थक असलेले रवि लांडगे यांनी स्थायी समिती सभापती संधी न दिल्यामुळे

## जोरदार फाईट होणार

सध्या वेगवेगळ्या पक्षात प्रवेश केलेले रवी लांडगे आणि राजेंद्र लांडगे यांच्या पॅनल मध्ये जोरदार फाईट होणार आहे. भारतीय जनता पार्टीचे नेते दिवंगत अंकुश लांडगे यांचे पुतणे रवी लांडगे आणि विद्यमान आमदार महेश लांडगे (MAHESH LANDGE) यांचे कट्टर समर्थक राजेंद्र लांडगे यांच्या पॅनल असणार आहे. या प्रभागात राष्ट्रवादी, शिवसेना नेते एकत्र लढतील असे चित्र दिसत आहे. 2017 च्या निवडणुकीप्रमाणे प्रभाग "रचना जैसे थे" आहे.

नंतरच्या काळात महेश लांडगेंच्या विरोधात भूमिका घेतली. भाजपा सदस्यत्त्वाचा राजीनामा दिला. भोसरी रुग्णालयाचे खासगीकरण आम्ही थांबवले. कोविड काळात हजारो नागरिकांनी याचा लाभ घेतला आहे. बहुउद्देशीय सभागृह आणि रुग्णालयाचे आरक्षण विकसित झाले, प्रभागातील नागरिकांच्या संपर्कात आहोत, सर्वच पक्ष स्वबळावर लढण्याच्या मानसिकतेमध्ये आहेत. त्यामुळे विकासकामांच्या जोरावर आम्ही निवडणूक निश्चितपणे जिकणार आहोत.गेल्या 8 वर्षांमध्ये आमदार महेश लांडगे यांच्या माध्यमातून अनेक विकासकामे मार्गी लागली आहेत. लोकांसोबत आमचे एक विश्वासाचे नाते निर्माण झाले आहे. रेड झोन आणि प्राधिकरण हद्दीत विखुरलेल्या प्रभागात आम्ही पायाभूत सोयी-सुविधा देण्याचा प्रयत्न केला आहे. त्याला लोकांची साथ मिळेल आणि आमचे चारही नगरसेवक निवडून येतील.महाविकास आघाडीच्या माध्यमातून विधानसभा निवडणूक 2024 मध्ये जोरदार तयारी केली. ठाकरे गटात प्रवेश केला. मात्र, महाविकास आघाडीच्या जागा वाटपामध्ये त्यांना सधी मिळाली नाही. विधानसभा निवडणुकीत त्यावेळी राष्ट्रवादी शरद पवार गटातून निवडणूक लढवलेले अजित गव्हाणे यांच्यासाठी रवि लांडगे यांनी प्रचार केला. मात्र, या निवडणुकीत महेश लांडगे यांनी बाजी मारली.

# तीन आमदार २२ जणांचा भाजपमध्ये प्रवेश

## चार माजी नगरसेवकांचा समावेश, दोन्ही 'राष्ट्रवादीं'ना धक्का

। पुणे ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे विद्यमान आमदार बापू पठारे, माजी मंत्री वसंत चव्हाण या दोन आमदारांचे पुत्र; तसेच मनसेचे दिवंगत आमदार रमेश वांजळे यांची कन्या, अजित पवारांच्या 'राष्ट्रवादी'तील दोन आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षातील दोन अशा चार नगरसेवकांसह २२ जणांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे. त्यामुळे दोन्ही 'राष्ट्रवादी' पक्षांना धक्का बसला आहे.**



मुंबई येथील भाजपच्या पक्ष कार्यालयात हे पक्षप्रवेश झाले. या वेळी प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, राज्याचे उच्च आणि तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ आदी उपस्थित होते.वडगाव शेरी विधानसभा मतदारसंघाचे राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे विद्यमान आमदार बापू पठारे यांचे चिरंजीव सुरेंद्र पठारे, मनसेचे खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे दिवंगत आमदार रमेश वांजळे यांची कन्या सायली वांजळे, माजी मंत्री वसंतराव चव्हाण यांचा पुत्र कणव चव्हाण यांचा समावेश आहे. वडगाव बुद्रुक-धायरी भागातील राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे माजी नगरसेवक विकास दांगट आणि पाषाण भागातील माजी नगरसेविका रोहिणी चिमटे; तसेच धनकवडीतील राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे माजी नगरसेवक बाळासाहेब धनकवडे आणि वारजे भागातील माजी नगरसेवक सचिन दोडके यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे. वडगाव शेरी विधानसभा मतदारसंघातील अजित पवार यांच्या 'राष्ट्रवादी'तील नारायण गलांडे, खंडू लोंढे यांच्यासह २२ पदाधिकाऱ्यांचा समावेश आहे. पुण्यात राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाबरोबर युती होणार नाही.

## प्रवेशासाठी मुख्यमंत्र्यांचा पुढाकार?

भाजपने अन्य पक्षांतील प्रबळ पदाधिकाऱ्यांना प्रवेश देण्यास सुरुवात केली आहे.आमदार बापू पठारे यांचे चिरंजीव सुरेंद्र पठारे यांचा प्रवेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकारातून झाल्याची चर्चा आहे. भाजपचे माजी आमदार जगदीश मुळीक यांचा सुरेंद्र यांच्या भाजपप्रवेशाला विरोध आहे. सुरेंद्र हे आमदार पठारे हे भाजपमध्ये असताना फडणवीस यांच्या पुण्यातील 'यंग ब्रिगेड'चे सक्रिय सदस्य होते. विधानसभा निवडणूक लढविण्यासाठी पठारे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसपक्षामध्ये प्रवेश करताना फडणवीस यांची परवानगी घेतली.

## मिशन- PCMC : भाजपा आमदार महेश लांडगे यांचा राष्ट्रवादीवर "सर्जिकल

# पिंपरी-चिंचवडमध्ये राजकीय भूकंप!

## सर्वपक्षीय मातब्बर नेत्यांचा भाजपात जाहीर प्रवेश!

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका निवडणुकीच्या निमित्ताने भाजपातील काही माजी नगरसेवक आणि पदाधिकाऱ्यांचा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुण्यात बारामती गेस्टहाउसमध्ये प्रवेश करुन घेतला. याला जोरदार प्रत्युत्तर देत भारतीय जनता पार्टीचे आमदार महेश लांडगे आज सर्वपक्षीय 22 ~~दिग्गजांचा भाजपात प्रवेश~~ करण्यात आला.**




महापालिका निवडणूक आचार संहिता सुरू झाली आहे. दि. 15 जानेवारी 2026 रोजी मतदान आणि दि. 16 जानेवारी रोजी निकाल घोषीत होईल. महापालिका निवडणुकीत भाजपा आणि राष्ट्रवादी अजित पवार गट स्वबळावर लढणार आहेत. शहरात राजकीय दिवाळी सुरू झाली असून, अजित पवारांनी वाजवल्या 'टिकल्या'; तर महेश लांडगेंनी लावला 'सुतळी बॉम्ब' असे निरीक्षण राजकीय जाणकारांनी नोंदवले आहे.

विशेष म्हणजे, प्रवेशांसाठी कोणत्याही स्थानिक नेत्याला पक्षश्रेष्ठींकडे विशेष 'फिल्डिंग' लावावी लागली नाही. त्यामुळे भारतीय जनता पार्टीच्या काळात शहरातील निर्णय शहरात होतात, यावर शिक्कामोर्तब झाले आहे. आमदार महेश लांडगे यांनी भाजपा पिंपरी-चिंचवड शहराचे नेते म्हणून राष्ट्रवादीला अक्षरशः घायाळ केले आहे. त्यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांचा मोठा 'सपोर्ट' असल्याचे सिद्ध झाले आहे.

> पिंपरी-चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक-2025-26 च्या निमित्त शहरातील सर्वपक्षीय मातब्बर नेते, पदाधिकारी, माजी नगरसेवक यांनी मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्तवाखाली आणि प्रदेशाध्यक्ष मा. श्री. रविंद्रजी चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता पार्टीमध्ये अधिकृत प्रवेश केला. सर्व पिंपरी-चिंचवडकर मान्यवरांचे भाजपा परिवारात हार्दिक स्वागत करतो. देव-देश-धर्म अन् संस्कृतीसाठी कटिबद्ध राहून पिंपरी-चिंचवडमध्ये "विकासाभिमूख हिंदुत्वाच्या" पिंपरी-चिंचवडमध्ये भारतीय जनता पार्टी निर्विवाद विजय मिळवण्याचा निर्धार आम्ही केला आहे.
>
> **–महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

### भारतीय जनता पार्टीत प्रवेश केलेल्या मान्यवरांची यादी पुढीलप्रमाणे :

१) माजी महापौर उभाठा गटाचे नेते – श्री संजोगजी वाघेरे पाटील
२) माजी अध्यक्ष, स्थायी समिती – सौ. उषाताई वाघेरे
३) राष्ट्रवादीचे माजी स्थायी समिती अध्यक्ष – श्री प्रशांत शितोळे
४) राष्ट्रवादीचे माजी विरोधी पक्षनेते – श्री विनोद नढे
५) राष्ट्रवादीचे माजी उपमहापौर – श्री प्रभाकर वाघेरे
६) माजी उपमहापौर – श्री राजू मिसाळ
७) उभाठा गटाचे नगरसेवक – श्री अमित गावडे
८) उभाठा गटाच्या नगरसेविका – सौ. मीनलताई यादव
९) श्री रवी लांडगे
१०) माजी नगरसेवक – श्री संजय नाना काटे
११) राष्ट्रवादीच्या माजी नगरसेविका – सौ. आशाताई सूर्यवंशी
१२) श्री प्रविण भालेकर
१३) श्री जालिंदर बापु शिंदे
१४) श्री सचिन सानप (स्वतः व पत्नी)
१५) श्री दादा सुखदेव नरळे (स्वतः व पत्नी)
१६) श्री सदगुरु कदम
१७) श्री समीर मासुळकर (स्वतः व पत्नी)
१८) डॉ. श्री सुहास कांबळे
१९) श्री कुशाग्र कदम
२०) श्री अशोक मगर
२१) श्री नागेश गवळी
२२) श्री प्रसाद शेट्टी – माजी नगरसेवक.
२३) श्री नवनाथ जगताप – माजी स्थायी समिती अध्यक्ष.
२४) श्री प्रभाकर वाघेरे – माजी उपमहापौर.

## अधिकारी, कर्मचाऱ्यांनी घेतले निवडणूक प्रशिक्षण

### 12 हजार जणांची नियुक्ती; आचारसंहितेचे पालन करण्याच्या सूचना

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या अनुषंगाने चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह व आकुर्डी प्राधिकरण येथील ग. दि. माडगूळकर सभागृहात निवडणूक प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते..**





या प्रशिक्षणासाठी एकूण ४ हजार ७६५ अधिकारी व कर्मचाऱ्यांना आदेश देण्यात आले होते. त्यापैकी सुमारे ३ हजार ५७३ अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रशिक्षण घेतले असल्याची माहिती मनुष्यबळ कक्षाचे सह आयुक्त मनोज लोणकर यांनी दिली.

महापालिका निवडणूक कामकाजासाठी रविवारी ४ हजार ७६५ अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह तसेच आकुर्डी प्राधिकरण येथील ग. दि. माडगूळकर सभागृहात प्रशिक्षण सुरू होणार आहे.

आज ज्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी निवडणूक प्रशिक्षण घेतले नाही किंवा प्रशिक्षणास अनुपस्थित राहिले आहेत, त्यांनी उद्या अनिवार्यपणे प्रशिक्षणास हजर राहून प्रशिक्षण पूर्ण करावे, असे आवाहन सह आयुक्त मनोज लोणकर यांनी केले आहे.

तसेच जे अधिकारी व कर्मचारी निवडणूक प्रशिक्षणास गैरहजर राहतील, त्यांच्यावर लोक प्रतिनिधित्व अधिनियमातील कलम १४ (२), (३) व (४) नुसार कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याची माहितीही सामान्य प्रशासन विभागाचे सह आयुक्त मनोज लोणकर यांनी दिली.



## भूमिका

# स्वयंपुनर्विकास हाच एकमेव मार्ग

**गृहनिर्माण व नगरविकासमंत्र्यांनी नुकतेच विधानसभेत मुंबई बेटातील सुमारे १९ हजार उपकरप्राप्त इमारतींबाबत माहिती दिली. त्यांना मिळालेल्या अधिकृत माहितीनुसार हे विधान केले असले, तरी वस्तुस्थिती यापेक्षा वेगळी आणि गंभीर आहे. म्हणूनच विसर पडलेल्या किंवा दुर्लक्षित केलेल्या वास्तवाची आठवण करून देणे क्रमप्राप्त ठरते.**

मुंबईत मूलत: सुमारे १९,८०० उपकर प्राप्त इमारती होत्या. यापैकी मोठ्या संख्येने इमारती अशा जमिनींवर होत्या ज्या रस्ता रुंदीकरण, पाणीपुरवठा, ड्रेनेज अशा सार्वजनिक सुविधांसाठी आवश्यक ठरल्या. त्यामुळे त्या जमिनी संपादित करून संबंधित भाडेकरूंना ३० ते ४० किलोमीटर दूर असलेल्या संक्रमण शिबिरांत हलविण्यात आले. सार्वजनिक हिताच्या कामासाठी आवश्यक नसलेल्या जमिनींवरील उपकर प्राप्त इमारतींतील भाडेकरूनाही खाली करून जमीन संपादन करण्यात आले. अशा प्रकारे एक हजाराहून अधिक उपकर प्राप्त इमारती ताब्यात घेण्यात आल्या. त्यापैकी काही ठिकाणी म्हाडाने पुनर्रचित इमारती उभ्या केल्या. या संपूर्ण प्रक्रियेची जबाबदारी म्हाडाने घेतली आणि मूळ रहिवाशांना नव्या इमारतींमध्ये घरे दिली. अतिरिक्त बांधकामातून निर्माण झालेल्या खोल्या अशा



इमारतींतील भाडेकरूंना देण्यात आल्या, ज्या इमारतींचा पुनर्विकास शक्य नव्हता. ही प्रक्रिया अनेक वर्षे सुरू होती.मात्र अचानक सरकारने म्हाडाचा पुनर्विकास कार्यक्रम जवळपास बंद करून रहिवाशांना बिल्डरांच्या माध्यमातून पुनर्विकास करण्याचा सल्ला दिला. याच वेळी संक्रमण शिबिरांत अडकलेल्या नागरिकांनी आंदोलन करून प्रश्न उपस्थित केला की, पुनर्विकासात सर्व फायदा बिल्डरांनाच होणार असेल तर आमच्या घरांचे काय? यावर सरकारने असे सांगितले की बिल्डरांवर मूळ भाडेकरूंना घरे देण्याची व काही घरे म्हाडाला देण्याची सक्ती असेल आणि ही घरे संक्रमण शिबिरांतील भाडेकरूंना दिली जातील. प्रत्यक्षात मात्र भाडेकरूंना व म्हाडाला द्यावयाच्या क्षेत्रफळाच्या तुलनेत बिल्डरांना प्रचंड अतिरिक्त एफएसआय मिळाला. या अतिरिक्त क्षेत्रफळातून उभारलेल्या घरांच्या विक्रीतून बिल्डरांनी प्रचंड नफा कमावला.हा नफा इतका मोठा होता की, अनेक ठिकाणी मूळ भाडेकरूंना नाममात्र रक्कम देऊन हाकलणे आणि त्यांच्या हक्काची घरे बाजारभावाने विकणे हेच बिल्डरांना अधिक फायदेशीर वाटले. अशा प्रकारे मुंबई 'रिकामी' करण्याचे कारस्थान राजकीय पुढारी, बिल्डर आणि अधिकारी यांच्या संगनमताने उघडपणे राबवले गेले. अनेक पुढाऱ्यांनी उपकरप्राप्त इमारती अत्यल्प दरात विकत घेतल्या. यासाठी मूळ मालकांना धमकावणे, तसेच म्हाडा व महानगरपालिकेकडून नोटिसा पाठवून त्रास देणे हे मार्ग अवलंबले गेले. पुढाऱ्यांनी विकत घेतलेल्या इमारती सोडल्या तर उरलेल्या इमारतींमध्ये देखील बिल्डरांबरोबर भागीदारी ठेवली. आता राज्यकर्ते व अधिकारी हे आपले भागीदार झाल्यामुळे बिल्डरांना सोकावले आणि म्हाडाला देय असलेली बांधकामेच थांबवली गेली.एका सार्वजनिक हित याचिकेत म्हाडाने कबूल केले की, अशा प्रकारे सुमारे ४० हजार फ्लॅट्स बिल्डरांनी म्हाडाला न देता बाजारभावाने विकले. आजच्या दराने त्यांची किंमत सुमारे एक लाख कोटी रुपयांपर्यंत जाते. याचिकाकर्त्यांचे म्हणणे आहे की कायद्याचे पालन झाले असते तर म्हाडाला किमान एक लाख फ्लॅट्स मिळाले असते, ज्यातून तीन लाख कोटी रुपयांपर्यंत महसूल मिळू शकला असता. एवढ्या रकमेत सर्व उपकरप्राप्त इमारती संपादित करून घरमालकांना नुकसानभरपाई देणे सहज शक्य होते. मात्र इतकी मोठी फसवणूक होऊनही बिल्डरांवर कोणतीही ठोस कारवाई झाली नाही. न दिलेल्या फ्लॅट्सऐवजी मोबदला भरण्याची पळवाट काढण्यात आली, पण तो मोबदला आजतागायत भरलेला नाही. तसेच अनेक भाडेकरूंशी करारनामा करूनही त्यांची भाडी बंद केलेली आहेत व भाडेकरू अक्षरश: रस्त्यावर आले आहेत. कोणत्याही बिल्डरवर म्हाडाने कारवाई केलेली नाही. कारण बिल्डर, पुढारी आणि अधिकारी या सर्व गोष्टी संगनमताने करीत आहेत. आता तर म्हाडाने कहरच केला आहे. ज्या इमारती आपण पुर्नविकसित करू असे म्हाडाने सांगितले होते.

## प्रासंगिक »

### माणिकमातेरे!

***मंत्रिमंडळातूनच हाकलून थांबू नये. त्यांची आमदारकी रद्द व्हावी यासाठीही पावले उचलायलाच हवीत.***

सरकार चालवण्यासाठी आघाडी करावी लागणे ही सत्ताधाऱ्यांची अपरिहार्यता असेल. पण ती महाराष्ट्राची अपरिहार्यता नाही. सत्ता राखता यावी यासाठी कोणाही गणंगास गोड मानून घेणे ही मुख्यमंत्र्यांची अपरिहार्यता असेल. पण ती महाराष्ट्राची अपरिहार्यता नाही. आघाडीतील घटक पक्षास दुखवू नये ही सत्ताधारी आघाडीतील मध्यवर्ती पक्षाची गरज असेल. पण ती महाराष्ट्राची गरज नाही. त्याच धर्तीवर न्यायालयाने एकदा नव्हे तर दोन वेळा दोषी ठरवलेल्यास मंत्रिमंडळातून हाकलून देता न येणे ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची अपरिहार्यता असेल. ती महाराष्ट्राची नाही. त्यामुळे स्वत:च्या अपरिहार्यतेवर मात करून फडणवीस यांनी माणिक कोकाटे यांच्या हाती नारळ दिला नाही तर कोकाटेंच्या गुन्ह्याचे शिंतोडे फडणवीस यांच्यावरही उडणार. गुन्हा करणारा दोषी असतो त्यापेक्षाही अधिक दोषी असतो त्या गुन्हेगारास पाठीशी घालणारा. हे सत्य. हा गुन्हा फडणवीस यांनी करू नये.

'अरे, स्वत:ला बुद्धिमान समजणाऱ्या माणसा! बाळासाहेब पक्षाला स्वत:च्या अपत्यासमान मानायचे हे खरे ना. मग त्याच पक्षाच्या विद्यामान पित्याला पक्षातली इतर भावंडेही धड सांभाळता येत नसतील, त्यामुळे उद्विग्न होऊन ते नव्या अपत्याला जन्म देत असतील तर त्यात त्यांची चूक काय?

# आहोत आम्ही टेस्ट ट्यूब बेबी!

आता तू त्याला टेस्ट ट्यूब बेबी म्हण की आणखी काही. आम्हाला काहीही फरक पडत नाही. आणि ही अशी बेबी अनौरस थोडीच असते. कायद्याने मान्यता आहे त्याला. त्यामुळे आम्ही औरस असल्याचे तुम्ही मान्य केले. तेव्हा आता तरी शांत बस. घरी आराम कर.' शिरसाटांचा हा युक्तिवाद ऐकून एकनाथरावांच्या कक्षात बसलेल्या साऱ्यांनी टाळ्या वाजवल्या. स्वत:ला विश्वप्रवक्ते समजणाऱ्या या संजयला मानसिक उपचाराची गरज आहे असे बावनकुळे म्हणतात तेच खरे यावर साऱ्यांचे एकमत झाले. शिंदेंनी एक कटाक्ष टाकताच शंभूराजे बोलू लागले. 'तुम्ही ज्यांची नावे घेतली ते आयोग, न्यायालय व चाणक्य आहेतच डॉक्टर. तेही निष्णात. लोकशाहीची प्रकृती ठणठणीत राहावी यासाठी सदैव झटणारे. होय, झाला जन्म आमचा त्यांच्या शल्यकौशल्यामुळे. गेल्या दोन वर्षांत हेच अपत्य धष्टपुष्ट झाले. सामान्यांनी निवडणुकांच्या माध्यमातून त्याच्यावर सकस



आहाररूपी मतांचा वर्षाव केला हे दिसत नाही का तुम्हाला? याच काळात मतांचा रतीब न मिळाल्यामुळे तुम्ही कुपोषित झालात त्याकडे लक्ष द्या ना जरा!आमचे बाल्यावस्थेतले संगोपन गुजरात व आसामसारख्या राज्यांनी केले. अमूलचे दूध पित मोठे झालो आम्ही. यातून जे बाळसे धरले त्याला कुणाची नजर लागू नये म्हणून काजळाची तीट लावण्याचे काम मराठी मतदारांनी इमानेइतबारे केले. तरीही तुमची पोटदुखी थांबायला तयार नाही? तेव्हा पक्षात इतके मोठे नेते असताना तुम्हाला मिळालेली राज्यसभा सरोगसीचा प्रकार नव्हता काय? देता का आता उत्तर?' यावर साऱ्यांनी टाळ्या वाजवल्या. मग शिंदेंनी दादा भुसेंकडे थोड्या संशयी नजरेने बघताच ते थेट उभेच झाले. 'या आधुनिक शिशुपालाचे दिवस आता भरत आले आहेत. होय, आम्ही आहोत तंत्रज्ञानातून जन्मलेले अपत्य, कृष्णाचा अवतार धारण केलेले. जन्म जरी देवकीच्या पोटचा असेल तरी यशोदेने वाढवलेले. तुमचा वंश समाप्तीकडे वाटचाल करू लागलाय. आमची वंशावळ तर वाढतीच. आधी स्वत:कडे लक्ष द्या, मग दुसऱ्याला नावे ठेवा.' हे ऐकून शिक्षण खात्यामुळे दादांमध्ये झालेला बदल सर्वांच्या लक्षात आला.मग शिंदेंनी बरे होऊन परतलेल्या उदयरावांकडे बघितले. इशारा समजताच ते हळू आवाजात म्हणाले. 'होय, आहोत आम्ही आयव्हीएफ तंत्रज्ञानातून जन्म घेतलेले. आधुनिकतेचा वसा जोपासणारे. तुम्ही तरी किमान तात्पुरती व्यवस्था असे म्हणू नका. ५० वर्षांपूर्वी जीव जन्माला घालणारे हे तंत्रज्ञान आता 'जिवंत' पक्ष जन्माला घालण्यापर्यंत पोहोचले हे लक्षात घ्या.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

**काँग्रेस स्वबळावर** ठाकरेंच्या शिवसेनेविरोधात निवडणूक लढवणार

# काँग्रेसचा ठाकरेंना धक्का!

## मुंबईकरांचे मूलभूत प्रश्न प्रलंबित



## हिंदू मुस्लीम वाद निर्माण

बैठकीनंतर बोलताना रमेश चेन्नीथला यांनी निवडणुका स्वबळावर लढवण्याबाबत पुनरुच्चार केला. लोकसभा व विधानसभेच्या निवडणुका महाविकास आघाडी म्हणून लढवल्या पण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर लढवाव्या अशी कार्यकर्त्यांची भावना आहे म्हणून मुंबई महानगरपालिका निवडणूक काँग्रेस पक्ष स्वबळावर लढवणार आहे, असे रमेश चेन्नीथला यांनी स्पष्ट केले.

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**शिवसेना ठाकरे गटाकडून महाविकास आघाडीत निवडणूक लढविण्याचे प्रयत्न सुरू असतानाच आघाडीचा भाग असलेल्या काँग्रेसने आपला स्वबळाचा नारा कायम ठेवला आहे. ही निवडणूक ठाकरेंची शिवसेना, भाजप विरोधात लढवणार असून धर्मनिरपेक्ष पक्षांनी काँग्रेससोबत यावे, असे आवाहन करताना काँग्रेसने सर्व २२७ जागांवर स्वबळावर लढण्याची तयारी केली असल्याचे काँग्रेस प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी जाहीर केले.**

काँग्रेसच्या राजकीय व्यवहार समितीची बैठक मुंबईत पार पडली. या बैठकीत मुंबई महापालिका निवडणुकीसंदर्भात चर्चा करण्यात आली. त्याचप्रमाणे २२७ जागांवर ९५० इच्छुकांच्या अर्जांचा आढावा घेण्यात आला. बैठकीनंतर बोलताना रमेश चेन्नीथला यांनी निवडणुका स्वबळावर लढवण्याबाबत पुनरुच्चार केला. लोकसभा व विधानसभेच्या निवडणुका महाविकास आघाडी म्हणून लढवल्या पण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर लढवाव्या अशी कार्यकर्त्यांची भावना आहे म्हणून मुंबई महानगरपालिका निवडणूक काँग्रेस पक्ष स्वबळावर लढवणार आहे, असे रमेश चेन्नीथला यांनी स्पष्ट केले.स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका मागील चार वर्षांपासून झालेल्या नाहीत. सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिल्याने या निवडणुका होत आहेत.निवडणुका व्हाव्यात अशी राज्य सरकारची इच्छाच नव्हती कारण सरकार थेट महापालिकेचा कारभार पहात होते. महानगर पालिका निवडणुकीसाठी काँग्रेस पक्षाने तयारी केली आहे.मुंबई महापालिकेत भ्रष्टाचार बोकाळला आहे. भाजपा महायुती जनतेच्या प्रश्नावर लक्ष न देता हिंदू मुस्लीम वाद निर्माण करून सामाजिक सलोखा बिघडवण्याचा प्रयत्न करत आहे, भाजपाजा हाच कार्यक्रम आहे. काँग्रेस पक्ष सर्व समाजाला सोबत घेऊन जाणार आहे. प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे मुंबईकरांचे मूलभूत प्रश्न प्रलंबित राहिले आहेत. विशेषत: गरीब आणि मध्यमवर्गीय नागरिकांना कोणतीही ठोस मदत मिळालेली नाही. मुंबईसारख्या देशाच्या आर्थिक राजधानीत नागरिकांना मूलभूत सुविधा मिळू नयेत, हे दुर्दैवी असल्याचे त्यांनी नमूद केले. महानगरपालिका निवडणुकीसाठी जाहिरनामा लवकरच प्रसिद्ध केला जाणार आहे. मुंबई महापालिकेत काँग्रेसची सत्ता आल्यास मुंबईकरांचे प्रश्न सोडवण्यास प्राधान्य दिले जाईल, असे चेन्नीथला म्हणाले. काँग्रेसच्या मुंबई अध्यक्षा वर्षा गायकवाड यांनी मुंबईकरांना विवाद नको तर विकास हवा आहे आणि काँग्रेसचा भर जनतेच्या मुद्द्यांवरच असेल. काही शक्ती जाती धर्माच्या नावाखाली वाद निर्माण करत आहेत पण काँग्रेस पक्ष विकासावर लक्ष केंद्रित करणार आहे. महानगरपालिकेची निवडणुक स्वबळावर लढवण्याचा निर्णय दोन महिन्यापूर्वी झालेल्या शिबिरातच झालेला आहे. येणाऱ्या काळात काँग्रेस पक्ष मजबुतीने निवडणुका लढणार असून प्रदूषण, पाणी,शिक्षण या मुलभूत विषयावर प्रचारात भर दिला जाणार आहे, असे खासदार वर्षा गायकवाड म्हणाल्या.या बैठकीला अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सचिव व सहप्रभारी यु. बी. व्यंकटेश, खासदार चंद्रकात हांडोरे, काँग्रेस कार्य समितीचे सदस्य नसीम खान, आमदार अस्लम शेख, अमिन पटेल, ज्योती गायकवाड, सचिन सावंत आदी उपस्थित होते.

# भाजपने लोकशाहीचा बाजार मांडला

## परिषदांच्या निवडणुकीबाबत ‘या’ नेत्याने केली जहरी टिका

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**अंबरनाथ नगर परिषदेत शिंदे सेनेने २०० बोगस मतदार आणल्याचा भाजपाचा आरोप आहे. येथेच भाजपच्या उमेदवारांकडून मतदारांना पैसे वाटताना अजित पवार यांच्या राष्ट्रवादीने दोघांना पकडून भरारी पथकाच्या ताब्यात दिले आहे.**



## , ईव्हीएम यंत्रावर आरोप

राज्य निवडणूक आयोगाने निवडणुका घेण्याचा फार्स न करता थेट बोली लावूनच भाजपच्या नगरसेवकांना विजयी घोषित करावे. त्यामुळे किमान निवडणुकीसाठी होणारा खर्च तरी वाचेल, असेही पवार यांनी म्हटले आहे.आजपर्यंत विरोधक, काँग्रेस निवडणूक प्रक्रियेवर, ईव्हीएम यंत्रावर आरोप करीत होती.

नांदेडच्या धर्माबादमध्ये पैशाचे अमिष दाखवून भाजपने शेकडो मतदारांना कोंडून ठेवत लोकशाहीचा जाहीर लिलाव मांडला आहे, अशी टिका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरद पवार) सरचिटणीस, आमदार रोहित पवार यांनी केली आहे. लोकशाहीचे अशा प्रकारे वस्त्रहरण होत असताना राज्य निवडणूक आयोग शांत बसला आहे. कोणत्याही परिस्थितीत भाजपला सत्ता मिळवून देण्याच्या मोहात अडकलेला राज्य निवडणूक आयोग धृतराष्ट्राप्रमाणे डोळ्याला पट्टी बांधून शांत बसला आहे.

हे असेच चालणार असेल तर राज्य निवडणूक आयोगाने निवडणुका घेण्याचा फार्स न करता थेट बोली लावूनच भाजपच्या नगरसेवकांना विजयी घोषित करावे. त्यामुळे किमान निवडणुकीसाठी होणारा खर्च तरी वाचेल, असेही पवार यांनी म्हटले आहे.आजपर्यंत विरोधक, काँग्रेस निवडणूक प्रक्रियेवर, ईव्हीएम यंत्रावर आरोप करीत होती. आताच्या नगर परिषदांच्या निवडणुकीत सत्ताधारी शिंदे सेनेचे कार्यकर्ते ईव्हीएम यंत्रावर, मतदान प्रक्रियेवर आरोप करीत आहेत. त्यामुळे राज्यात निवडणुका पारदर्शकपणे होत आहेत की नाही, असा प्रश्न उपस्थित होत आहे, अशी टीका खासदार सुप्रिया सुळे यांनी केली आहे.अंबरनाथ नगर परिषदेत शिंदे सेनेने २०० बोगस मतदार आणल्याचा भाजपाचा आरोप आहे. येथेच भाजपच्या उमेदवारांकडून मतदारांना पैसे वाटताना अजित पवार यांच्या राष्ट्रवादीने दोघांना पकडून भरारी पथकाच्या ताब्यात दिले आहे. नांदेडच्या धर्माबादमध्ये पैशाचे अमिष दाखवून भाजपने शेकडो मतदारांना कोंडून ठेवत लोकशाहीचा जाहीर लिलाव मांडला आहे, अशी टिका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरद पवार) सरचिटणीस, आमदार रोहित पवार यांनी केली आहे. लोकशाहीचे अशा प्रकारे वस्त्रहरण होत असताना राज्य निवडणूक आयोग शांत बसला आहे. कोणत्याही परिस्थितीत भाजपला सत्ता मिळवून देण्याच्या मोहात अडकलेला राज्य निवडणूक आयोग धृतराष्ट्राप्रमाणे डोळ्याला पट्टी बांधून शांत बसला आहे.

## ईशान्येकडील राज्यांकडे दुर्लक्ष

## पंतप्रधान मोदींचा इंडिया आघाडीवर घणाघात

# घुसखोरांना पाठिशी घालत आहेत

## घुसखोरांना संरक्षण देण्याचा प्रयत्न

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी आसाम येथे बोलत असताना काँग्रेसवर जोरदार टीका केली. काँग्रेस सत्तेत असताना त्यांनी आसाम आणि ईशान्येकडील राज्यांकडे दुर्लक्ष केले. तसेच या प्रदेशाची सुरक्षा आणि विशेष ओळख पुसून टाकत घुसखोरांना संरक्षण दिले, असा आरोप पंतप्रधान मोदींनी केला. गुवाहाटी विमानतळावरील नवीन टर्मिनलचे उद्घाटन केल्यानंतर एका जाहीर सभेला संबोधित करत असताना पंतप्रधान मोदी यांनी एसआयआरला होत असलेल्या विरोधावरून इंडिया आघाडीवर टीका केली.**



पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, निवडणूक आयोगाने मतदार यादीच्या सुधारणेचा (SIR) कार्यक्रम हाती घेतला आहे. याचा उद्देश देशातील घुसखोरांना लोकशाही प्रक्रियेपासून दूर ठेवणे आहे. मात्र देशद्रोही घुसखोरांना संरक्षण देण्याचा प्रयत्न करत आहे.आसाम आणि ईशान्येकडील राज्यांचा विकास हा कधीही काँग्रेसच्या अजेंड्याचा भाग नव्हता, असेही पंतप्रधान मोदी यांनी सांगितले. घुसखोरांना या राज्यांतील जंगल आणि जमीन बळकावण्याची परवानगी दिली गेली. त्यामुळे या प्रदेशाची सुरक्षा आणि मूळ ओळख धोक्यात आली. भाजपाचे सरकार सत्तेत आल्यानंतर काँग्रेसने अनेक दशकांपासून केलेल्या चुका दुरुस्त करण्याचे काम केले. भाजपाच्या सरकारने केलेल्या कामांवर प्रकाश टाकताना पंतप्रधान मोदी म्हणाले, आसाममध्ये डबल इंजिनचे सरकार आल्यापासून राज्याचा विकास अखंडपणे सुरू आहे. याची तुलना त्यांनी अखंड वाहनाऱ्या ब्रह्मपुत्रेशी केली. आसामशी आपली विशेष जवळीक असून या राज्यापासून प्रेरणा मिळते. आसाम हे संपूर्ण ईशान्य भारताच्या विकासाचे प्रवेशद्वार म्हणून उद्यास येत असल्याचेही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे शनिवारी दुपारी गुवाहाटी येथे दोन दिवसांच्या आसाम दौऱ्यावर आले. त्यांचे आगमन झाल्यानंतर त्यांनी विमानतळावर आसामचे पहिले मुख्यमंत्री आणि काँग्रेस नेते गोपीनाथ बारदोलोई यांच्या पुतळ्याचे अनावरण केले. त्यानंतर अदानी एअरपोर्ट होल्डिंग्ज लिमिटेडने विकसित केलेल्या नवीन टर्मिनल इमारतीचे अनावरण केले. काय कार्यक्रमात मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा, केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्री राममोहन नायडू, केंद्रीय मंत्री आणि मुख्यमंत्री सर्वानंद सोनोवाल आणि अदानी समूहाचे अध्यक्ष गौतम अदानी उपस्थित होते.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी आसाम येथे बोलत असताना काँग्रेसवर जोरदार टीका केली. काँग्रेस सत्तेत असताना त्यांनी आसाम आणि ईशान्येकडील राज्यांकडे दुर्लक्ष केले. तसेच या प्रदेशाची सुरक्षा आणि विशेष ओळख पुसून टाकत घुसखोरांना संरक्षण दिले, असा आरोप पंतप्रधान मोदींनी केला. गुवाहाटी विमानतळावरील नवीन टर्मिनलचे उद्घाटन केल्यानंतर एका जाहीर सभेला संबोधित करत असताना पंतप्रधान मोदी यांनी एसआयआरला होत असलेल्या विरोधावरून इंडिया आघाडीवर टीका केली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, निवडणूक आयोगाने मतदार यादीच्या सुधारणेचा (SIR) कार्यक्रम हाती घेतला आहे. याचा उद्देश देशातील घुसखोरांना लोकशाही प्रक्रियेपासून दूर ठेवणे आहे. मात्र देशद्रोही घुसखोरांना संरक्षण देण्याचा प्रयत्न करत आहे.आसाम आणि ईशान्येकडील राज्यांचा विकास हा कधीही काँग्रेसच्या अजेंड्याचा भाग नव्हता, असेही पंतप्रधान मोदी यांनी सांगितले. घुसखोरांना या राज्यांतील जंगल आणि जमीन बळकावण्याची परवानगी दिली गेली.

### राज्याचा विकास अखंडपणे

या प्रदेशाची सुरक्षा आणि मूळ ओळख धोक्यात आली. भाजपाचे सरकार सत्तेत आल्यानंतर काँग्रेसने अनेक दशकांपासून केलेल्या चुका दुरुस्त करण्याचे काम केले.भाजपाच्या सरकारने केलेल्या कामांवर प्रकाश टाकताना पंतप्रधान मोदी म्हणाले, आसाममध्ये डबल इंजिनचे सरकार आल्यापासून राज्याचा विकास अखंडपणे सुरू आहे.

# लेफ्टनंट कर्नल च्या घरी CBI ची धाड

## नोटांचे बंडल पाहून अधिकारी हैराण; संरक्षण मंत्रालयात खळबळ!

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**केंद्रीय अन्वेषण ब्युरो अर्थात सीबीआयने शनिवारी संरक्षण मंत्रालयाच्या अंतर्गत येणाऱ्या सुरक्षा उत्पादन विभागात कार्यरत असणाऱ्या लेफ्टनंट कर्नल दीपक कुमार शर्मा यांना लाच घेतल्याच्या आरोपाखाली अटक केली. बंगळुरूमधील कंपनीकडून त्यांनी कथितरित्या तीन लाख रुपयांची लाच घेतल्याचा आरोप करण्यात येत आहे.**




सीबीआयच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, शर्मा यांच्या घराची झडती घेतली असता तिथे २.२३ कोटी रुपयांची रोकड आढळून आली.संरक्षण मंत्रालयाच्या अंतर्गत येणाऱ्या आंतरराष्ट्रीय सहयोग आणि निर्यात प्रकरणांशी संबंधित डेप्युटी प्लॅनिंग ऑफिसर म्हणून कार्यरत असलेले लेफ्टनंट कर्नल दीपक कुमार शर्मा आणि त्यांची पत्नी कर्नल काजल बाली यांच्या विरोधात गुन्हा दाखल झाला आहे.कर्नल बाली या सध्या राजस्थानच्या श्री गंगानगर येथील १६ इन्फंट्री डिव्हिजन ऑर्डिनन्स युनिटमध्ये कमांडिंग ऑफिसर म्हणून तैनात आहेत.सीबीआयच्या प्रवक्त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, लेफ्टनंट कर्नल शर्मा हे संरक्षण उत्पादनांचे निर्माण आणि निर्यातीशी जोडल्या गेलेल्या अनेक खासगी कंपन्यांशी संगनमत करून फौजदारी गुन्ह्यांशी संबंधित कारवायांमध्ये गुंतले होते.सीबीआयने केलेल्या आरोपानुसार, कंपन्यांना लाभ मिळवून देण्याच्या बदल्यात शर्मा यांनी रोख रक्कम घेतली होती. बंगळुरू स्थित एका कंपनीकडून शर्मा यांना रोकड मिळणार असल्याची माहिती सीबीआयच्या हाती लागली होती.सीबीआयने दिलेल्या माहितीनुसार राजीव यादव आणि रवजीत सिंह नावाचे दोन इसम लेफ्टनंट कर्नल दीपक कुमार शर्मा यांच्या नियमित संपर्कात होते. त्यांच्या कंपनीला लाभ मिळण्यासाठी ते अवैध मार्गांचा वापर करत होते. १८ डिसेंबर २०२५ रोजी या कंपनीच्या इशाऱ्यावर विनोद कुमार नामक व्यक्तीने दीपक कुमार शर्मा यांना ३ लाख रुपयांची लाच दिली.

शर्मा यांच्या दिल्लीस्थित घरात झडती घेतली असता २.२३ कोटी रुपयांची रोकड आणि लाच म्हणून स्वीकारलेले ३ लाख रुपये आढळून आले आहेत. तसेच श्रीगंगानगर येथील पत्नीच्या निवासस्थानाहून १० लाख रुपये जप्त करण्यात आले आहेत. शनिवारी शर्मा आणि विनोद कुमार यांना विशेष न्यायालयात सादर केले असता त्यांना २३ डिसेंबर पर्यंतची सीबीआय कोठडी सुनावण्यात आली.

### २.२३ कोटींची रोकड जप्त

सीबीआयच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, शर्मा यांच्या घराची झडती घेतली असता तिथे २.२३ कोटी रुपयांची रोकड आढळून आली. संरक्षण मंत्रालयाच्या अंतर्गत येणाऱ्या आंतरराष्ट्रीय सहयोग आणि निर्यात प्रकरणांशी संबंधित डेप्युटी प्लॅनिंग ऑफिसर म्हणून कार्यरत असलेले लेफ्टनंट कर्नल दीपक कुमार शर्मा आणि त्यांची पत्नी कर्नल काजल बाली यांच्या विरोधात गुन्हा दाखल झाला आहे.

# अभिनेत्री नोरा फतेहीच्या गाडीचा मुंबईत अपघात

बॉलिवूडची प्रसिद्ध अभिनेत्री नोरा फतेहीच्या गाडीचा मुंबईत अपघात झाल्याची माहिती समोर येत आहे. अमेरिकन डीजे डेव्हिड गुएटाच्या सनबर्न कॉन्सर्टमध्ये सहभागी होण्यासाठी जात असताना हा अपघात घडला. एका मद्यधुंद चालकाने नोरा फतेहीच्या कारला जोरदार धडक दिली. यानंतर तिच्या टीमने तिला तात्काळ जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी नेले. डॉक्टरांनी सीटी स्कॅन करून अंतर्गत रक्तस्त्राव किंवा दुखापत झाला आहे का? याची तपासणी केली. नोरा फतेहीला गंभीर दुखापत झाली नसली तरी या घटनेमुळे तिला मानसिक धक्का बसल्याचे सांगितले जाते. ही बातमी हिंदुस्तान टाइम्स या संकेतस्थळाने दिली आहे. सूत्रांनी हिंदुस्तान टाइम्सला दिलेल्या माहितीनुसार, डॉक्टरांनी विश्रांतीचा सल्ला दिला असतानाही नोरा फतेहीने तिचे व्यावसायिक कर्तव्य पार पाडण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर ती शनिवारी रात्री होत असलेल्या सनबर्न फेस्टिव्हलसाठी गेली.नोरा फतेही अमेरिकन डीजे डेव्हिड गुएटासह एकाच मंचावर सनबर्न फेस्टिव्हलमध्ये परफॉर्म करणार होती. गेल्या काही वर्षांपासून नोरा फतेही जागतिक किर्तीच्या कलाकारांसह कॉन्सर्ट आणि आंतरराष्ट्रीय अल्बममध्ये दिसून येत आहे. जेसन डेरुलोचे स्नेक आणि ओह मामा टेटेमा या



गाण्यांमध्ये ती दिसली. तसेच जमैकन गायिका शेन्सीयाबरोबर ती 'व्हॉट डू आय नो?' या गाण्यात एकत्र दिसली होती.तसेच अमेरिकन कलाकार जिमी फॅलोनच्या टुनाईट शोमध्ये नोरा फतेहीने 'व्हॉट डू आय नो?' या गाण्यावर नृत्य सादर केले होते. अनटोल्ड दुबई इंटरनॅशनल म्युझिक फेस्टिव्हलमध्येही नोरा फतेहीने आपल्या नृत्याचे सादरीकरण केले होते.चित्रपटांच्या बाबत बोलायचे झाल्यास नोरा फतेही या वर्षात बी हॅप्पी, उफ्फ ये सियापा आणि थम्मा या चित्रपटांमध्ये दिसली. बी हॅप्पीमधील अभिनय आणि थम्मामधील आयटम साँगमुळे तिचे नाव चर्चेत होते. काही काळापूर्वी नेटफ्लिक्सवर प्रदर्शित झालेल्या द रॉयल्स या वेबसीरीजमध्येही ती दिसली होती.बॉलिवूडची प्रसिद्ध अभिनेत्री नोरा फतेहीच्या गाडीचा मुंबईत अपघात झाल्याची माहिती समोर येत आहे. अमेरिकन डीजे डेव्हिड गुएटाच्या सनबर्न कॉन्सर्टमध्ये सहभागी होण्यासाठी जात असताना हा अपघात घडला.

## जुई गडकरीने दिलं खास गिफ्ट

'ठरलं तर मग' मालिकेचा चाहतावर्ग मोठ्या प्रमाणात आहे. ही सिरियल टीआरपीमध्ये देखील कायम अग्रेसर असते. या मालिकेतील सगळेच कलाकार गेल्या अडीच वर्षात घराघरांत लोकप्रिय झाले आहेत. यापैकी अर्जुनच्या सख्ख्या बहिणीची म्हणजेच अस्मिताची भूमिका साकारणाऱ्या मोनिका दबाडेने काही महिन्यांपूर्वीच ती आई होणार असल्याची गूडन्यूज प्रेक्षकांना दिली होती. फेब्रुवारी महिन्याच्या अखेरीस 'ठरलं तर मग' मालिकेतून मोनिकाने काही महिन्यांसाठी ब्रेक घेतला.अभिनेत्रीने लेकीचं नाव वृंदा असं ठेवलं आहे. मध्यंतरी 'ठरलं तर मग' मालिकेतील कल्पना म्हणजेच अभिनेत्री प्राजक्ता दिघे यांनी मोनिकासाठी लेकीच्या जन्मानंतर खास लाडू बनवून पाठवले होते. आता त्यांच्या पाठोपाठ मालिकेची मुख्य नायिका जुई गडकरीने सुद्धा वृंदाला खास गिफ्ट दिलं आहे.

## आयशाने दिलं चांगलंच उत्तर



बऱ्याच काळानंतर 'वाँटेड' फेम अभिनेत्री आयशा टाकिया काही दिवसांपूर्वी मुंबई विमानतळावर दिसली होती. यादरम्यानचे अनेक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. पण आयशाच्या लूकवरून लोकांनी तिला ट्रोल केलं. "प्लास्टिक सर्जरी करून हिने स्वतःचा चेहरा बिघडवला', अशा आशयाच्या अनेक प्रतिक्रिया लोकांनी तिच्या व्हिडीओवर दिल्या होत्या. एवढंच नाहीतर लोकांनी तिला शरीर रचनेवरून ट्रोल केलं होतं. मात्र आता ट्रोलर्सला आयशाने चांगलंच उत्तर दिलं आहे.अभिनेत्री आयशा टाकियाने ट्रोल झाल्यानंतर सोशल मीडियावर भलीमोठी पोस्ट लिहिली आहे. आयशा म्हणाली, "मला हे सांगण्याची गरज आहे. दोन दिवसांपूर्वी माझ्या कुटुंबात मेडिकल इमरजेंसी असल्यामुळे गोव्याला निघाले होते. माझी बहीण हॉस्पिटलमध्ये आहे. यादरम्यान मला विमानतळावर काही पापाराझींना थांबवलं. त्यामुळे काही वेळात मी पापाराझींसाठी पोझ दिल्या. पण आपल्या देशात माझ्या लूकवर बोलण्याशिवाय इतर कोणतेही महत्त्वाचे मुद्दे नाहीत, असं मला वाटतं. अनेक जण बेताल मतं मांडत आहेत. मला कसं दिसायला पाहिजे होतं आणि कसं नाही याविषयी बोललं जात आहे. पण मला कुठलाही चित्रपट करण्यात किंवा पुन्हा कमबॅक करण्यात अजिबात रस नाही.

## अशी' मिळाली अक्षयला 'जानवर'मधील भूमिका

अक्षय कुमार हा आज बॉलीवूडमधील प्रसिद्ध अभिनेता म्हणून ओळखला जातो. त्याचा चाहतावर्गही खूप मोठा आहे. पण, करिअरच्या सुरुवातीला मात्र अभिनेत्याच्या अनेक चित्रपटांना अपयश आलेलं. १९९७-१९९९ हा काळ असा होता, जेव्हा अक्षय कुमारने सर्वाधिक फ्लॉप चित्रपट दिलेले. पण, कलाकार म्हटलं की चढ-उतार येतच असतात. असंच काहीसं अक्षयबरोबरही झालं. अक्षय कुमारने 'जानवर' चित्रपटात बादशाह म्हणजेच बाबू लोहार ही भूमिका साकारली होती. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर चांगलीच कमाई केली होती. महत्त्वाचं म्हणजे यातील अक्षय कुमारच्या कामाचं अनेकांनी कौतुक केलं होतं. पण, तुम्हाला माहीत आहे का? या चित्रपटासाठी अक्षय कुमार पहिली पसंती नव्हता, तर एक वेगळाच अभिनेता चित्रपटाचा नायक असणार होता. चित्रपटाचे दिग्दर्शक सुनील दर्शन यांनी 'इंडिया टुडे'ला दिलेल्या मुलाखतीमध्ये याबाबत सांगितलेलं. सुनील दर्शन म्हणाले, "या चित्रपटासाठी पहिली पसंती ही अभिनेता सनी देओलला होती. आम्ही चित्रपटाचं काम सुरू करणार होतो, पण तितक्यात आमचं त्याच्याबरोबर काही गोष्टींवरून वाद झाले. ते वाद आजही मिटलेले नाहीत, त्यामुळे मी ठरवलं की या चित्रपटासाठी दुसरा अभिनेता शोधू."मुख्य नायकाच्या शोधात असताना सुनील दर्शन यांनी अभिनेता अजय देवगणला यासाठी विचारलं. ते म्हणाले, "अजय व मी एका शनिवारी भेटून याबद्दल चर्चा केली आणि हा चित्रपट करायचं ठरलं. सोमवारी सगळं ठरवून कामाला सुरुवात करणारच होतो तेवढ्यात रविवारी सगळंच बदलून गेलं". सनी देओलसह वाद झाल्यानंतर सुनील यांनी अजय देवगण व काजोलबरोबर हा चित्रपट करण्याचा निर्णय घेतला होता. पण, त्याचदरम्यान या दोघांनी लग्न करण्याचा निर्णय घेतला. सुनील दर्शन यांना त्यादरम्यान अक्षय कुमाराचा फोन आला होता, ज्याला ते कधीच भेटले नव्हते. सुनील म्हणाले, "त्याने मला फोन करून म्हटलं, त्याला शक्य तितक्या लवकर मला भेटायचं आहे.



## नायिका उधळून लावणार खलनायिकांचा कट

'स्टार प्रवाह'वर यंदा वटपौर्णिमानिमित्त "महानायिकांची महावटपौर्णिमा" असा विशेष भाग दाखवला जाणार आहे. यानिमित्त वाहिनीवरील विविध मालिकेतील नायिका एकत्र आल्या आहेत. या विशेष भागाचं मालिकेतील नायक, नायिका आणि खलनायिका यांनी एकत्रित चित्रीकरण केलं आहे, त्यामुळे यंदा वटपौर्णिमेला प्रेक्षकांना हा विशेष भाग पाहता येणार आहे.जुई गडकरीने नुकतीच यानिमित्ताने एक मुलाखत दिली आहे. जुई 'स्टार प्रवाह'वरील 'ठरलं तर मग' या मालिकेत सायली हे पात्र साकारत आहे. यावेळी सायली वटपौर्णिमेनिमित्त पारंपरिक अंदाजात तयार झाली आहे, तर यावेळी सायलीने घेतलेल्या उखाण्याने लक्ष वेधलं आहे. तिने उखाणा घेत म्हटलं, "वटपौर्णिमेला पूजा होते ते झाड आहे वट, स्टार प्रवाहाच्या सर्व महानायिका उधळून लावणार खलनायिकांचा कट."'स्टार प्रवाह'वरील 'ठरलं तर मग', 'प्रेमाची गोष्ट', 'थोडं तुझं थोडं माझं','लग्नानंतर होईलंच प्रेम', 'येड लागलं प्रेमाचं' यांसारख्या इतर मालिकांमधील नायिकांनी एकत्र येत वटपौर्णिमेनिमित्त या खास भागाचं एकत्रित चित्रीकरण केलं आहे.
यावेळी त्यांच्याबरोबर वाहिनीवरील सर्व नायकही उपस्थित असून नायिकांवर आलेल्या संकटापासून ते त्यांच्या पत्नीची कशी रक्षा करणार हे पाहायला मिळणार आहे. दरम्यान, काही दिवसांपूर्वीच या सीनचं शूटिंग झालं असून, यावेळी सर्व नायक गुंडांशी एकहात करताना दिसले. हा सीन शूट करताना कलाकारांची कशी तारांबळ उडाली, याबाबत त्यांनी अनेक मुलाखतींमधून सांगितलं आहे. एकूणच यंदाची वटपौर्णिमाही मालिकाप्रेमींसाठी खास ठरणार आहे.

**शुभमन गिलला डच्चू**

## सूर्यकुमार फलंदाज म्हणून अपयशी

# सूर्यकुमारचे स्थान मात्र कायम!

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**निवड समितीचे अध्यक्ष अजित आगरकर आणि मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर ही जोडी एकत्रित आल्यापासून भारतीय क्रिकेट संघात वेगवेगळे प्रयोग झाल्याचे पहायला मिळाले आहे. कोणत्याही प्रारूपासाठी संघनिवड असो, त्यात काही धक्कादायक निर्णय घेतले जातातच. पुढील वर्षी घरच्या मैदानांवर होणाऱ्या ट्रेन्टी-२० विश्वचषक स्पर्धेसाठीची संघनिवडही याला अपवाद ठरली नाही.**

## कर्णधार म्हणून कामगिरी उत्कृष्ट



उपकर्णधार शुभमन गिलला या संघातून वगळण्याचा अनपेक्षित निर्णय घेण्यात आला. गिलप्रमाणेच धावांसाठी झगडणाऱ्या सूर्यकुमार यादवचे संघातील स्थान आणि कर्णधारपद मात्र कायम राहिले. त्याच वेळी दोन वर्षांपासून भारतीय संघाबाहेर असलेल्या इशान किशनचे पुनरागमन झाले. यासह अन्यही काही निर्णयांची बरीच चर्चा रंगली. त्यांचा आढावा.गेल्या काही काळापासून सूर्यकुमार आणि गिल यांची कामगिरी भारतासाठी चिंताजनक ठरत होती. आंतरराष्ट्रीय स्तरावर या वर्षभरात खेळलेल्या २१ ट्रेन्टी-२० सामन्यांत सूर्यकुमारला एकही अर्धशतक करता आले नाही. त्याने या सामन्यांत केवळ १३.६२ च्या सरासरीने धावा केल्या. गिलची परिस्थितीही काहीशी अशीच. त्याचे आशिया चषकासाठी ट्रेन्टी-२० संघात पुनरागमन झाले. त्यानंतरच्या १५ ट्रेन्टी-२० सामन्यांत मिळून त्याला २४ च्या सरासरीने केवळ २९१ धावाच करता आल्या. गिलनेही वर्षभरात एकही ट्रेन्टी-२० अर्धशतक केले नाही. असे असले तरी, विश्वचषकासाठी सूर्यकुमारचे भारतीय संघातील स्थान कायम असून गिलला वगळण्यात आले आहे. सूर्यकुमार फलंदाज म्हणून अपयशी ठरत असला, तरी कर्णधार म्हणून त्याची कामगिरी उत्कृष्ट आहे. सूर्यकुमारच्या नेतृत्वाखाली भारताने ३८ पैकी ३० सामने जिंकले आहेत. त्याने एकही मालिका गमावलेली नाही. त्यामुळेच बहुधा त्याच्यावरील विश्वास कायम आहे. दक्षिण आफ्रिकेविरुद्ध नुकत्याच झालेल्या ट्रेन्टी-२० मालिकेदरम्यान गिलच्या पायाला दुखापत झाली. त्यामुळे तो निर्णायक पाचव्या सामन्याला मुकला आणि संजू सॅमसनला संधी मिळाली. सॅमसनने सुरुवातीपासूनच फटकेबाजी करताना २२ चेंडूंत ३७ धावा केल्या. त्यामुळे सलामीच्या स्थानाबाबत पुन्हा एकदा चर्चेला सुरुवात झाली. गेल्या ट्रेन्टी-२० विश्वचषकानंतर रोहित शर्माने क्रिकेटच्या या लघुत्तम प्रारूपातून निवृत्ती घेतली. त्याने रिक्त केलेल्या सलामीच्या स्थानी सुरुवातीला सॅमसनला खेळविण्यात आले. सॅमसनने काहीच सामन्यांच्या अंतराने तीन शतकेही साकारली. मात्र, काही महिन्यांपूर्वी झालेल्या आशिया चषक स्पर्धेसाठी गिलला ट्रेन्टी-२० संघात स्थान देण्यात आले आणि त्याला सॅमसनच्या जागी सलामीला खेळविण्यात आले. गिलला निवड समिती व संघ व्यवस्थापनाचा विश्वास सार्थ ठरवता आला नाही. त्यामुळे आता त्याला वगळण्यात आले असून सलामीच्या स्थानासाठी सॅमसनला प्राधान्य देण्यात आले आहे. आम्हाला सलामीच्या स्थानासाठी यष्टिरक्षण करणारा फलंदाज हवा होता, असे आगरकर आणि कर्णधार सूर्यकुमार यांनी ट्रेन्टी-२० विश्वचषकासाठी भारतीय संघाची घोषणा करताना सांगितले. त्यामुळे सॅमसनसह इशान किशनची संघात निवड झाली. नुकत्याच झालेल्या सय्यद मुश्ताक अली ट्रेन्टी-२० स्पर्धेत इशानने अप्रतिम कामगिरी करताना १० सामन्यांत सर्वाधिक ५१७ धावा केल्या. यात दोन शतके आणि दोन अर्धशतकांचा समावेश होता. त्याने अंतिम लढतीतही शतक साकारले. त्याच्या नेतृत्वाखाली झारखंडने प्रथमच या स्पर्धेचे जेतेपद मिळवले. या उल्लेखनीय कामगिरीमुळेच त्याने निवड समितीचे लक्ष वेधून घेतले. ट्रेन्टी-२० विश्वचषकासाठी सॅमसन आणि इशान असे दोन यष्टिरक्षक संघात असल्याने जितेश शर्माला डच्चू देण्यात आला. त्यामुळे 'फिनिशर' अर्थात विजयवीराची एक जागा रिक्त झाली

## म्हणूनही गिलला वगळले?

आता अखेरच्या षटकांत फटकेबाजीची जबाबदारी रिंकू, हार्दिक पंड्या आणि शिवम दुबे यांच्यावर असेल.भारतीय संघाचा प्रशिक्षक गंभीरने अष्टपैलू खेळाडूंना नेहमीच प्राधान्य दिले आहे. ट्रेन्टी-२० विश्वचषकासाठीचा संघही याला अपवाद ठरला नाही. हार्दिक पंड्या आणि शिवम दुबे हे फलंदाजीसह वेगवान गोलंदाजी करणारे अष्टपैलू, तसेच अक्षर पटेल आणि वॉशिंग्टन सुंदर हे फिरकी गोलंदाजीसह फलंदाजीत योगदान देणारे अष्टपैलू भारतीय संघाचा भाग आहेत.

# किशनला अखेर टीम इंडियाचं दार उघडलं

## वर्ल्डकपचं तिकीट तर मिळवलं पण 'या' कारणामुळे टेन्शन कायम

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**अखेर इशान किशनसाठी भारतीय टी-२० संघाचं दार उघडलं आहे. गेल्या २ वर्षांपासून भारतीय संघात पुनरागमन करण्याच्या प्रतिक्षेत असणाऱ्या इशान किशनला न्यूझीलंडविरूद्ध होणाऱ्या टी-२० मालिकेसाठी आणि आयसीसी टी-२० वर्ल्डकप २०२५ स्पर्धेसाठी भारतीय संघात स्थान देण्यात आलं आहे.**




तर संघाचा उपकर्णधार शुबमन गिलला टी-२० संघातून वगळण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. आयपीएल स्पर्धेत दमदार शतक आणि देशांतर्गत क्रिकेटमध्ये धावांचा पाऊस पाडल्यानंतर इशान किशनला भारतीय संघात स्थान देण्याची मागणी जोर धरू लागली होती. अखेर त्याला संघात प्रवेश मिळाला आहे.

शुबमन गिलला बाहेर करून इशान किशनला उगाच स्थान दिलं गेलेलं नाही. त्याचा फॉर्म हे त्याला संघात स्थान मिळवून देण्यामागचं सर्वात मोठं कारण आहे. सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी २०२५ स्पर्धेत त्याने झारखंड संघाचं नेतृत्व करताना धावांचा पाऊस पाडला. एकही सामना न गमावता झारखंडने जेतेपदाचा मान मिळवला. स्पर्धेतील अंतिम सामन्यात हरियाणाविरूद्ध खेळताना इशानने दमदार शतकी खेळी केली. या स्पर्धेतील १० डावात त्याने ५७.४४ च्या दमदार सरासरीने ५१७ धावा केल्या.इशान किशनला वर्ल्डकप स्पर्धेसाठी संघात स्थान तर मिळालं आहे, पण काम अजूनही संपलेलं नाही. टी-२० वर्ल्डकपआधी भारत आणि न्यूझीलंड या दोन्ही संघांमध्ये ५ टी-२० सामन्यांची मालिका खेळायची आहे. या मालिकेत इशान किशनलाही प्लेईंग ११ मध्ये संधी दिली जाऊ शकते.

## इशान किशन दमदार फॉर्ममध्ये

या मालिकेत त्याला स्वत:चा फॉर्म सिद्ध करावा लागणार आहे. या मालिकेत जर तो चमकला, तर त्याचं संघातील स्थान फिक्स होईल. पण जर फ्लॉप ठरला, तर संघात बदल करण्याचा अधिकार निवडकर्त्यांकडे आहे. पण तसं काही होण्याची शक्यता खूप कमी आहे. कारण इशान किशन दमदार फॉर्ममध्ये आहे. तो या मालिकेतही धावांचा पाऊस पाडू शकतो.

स्मार्ट PCMC
SMART CITY
# महाईन्यूज ™
epaper.mahaenews.com
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती
ePaper
। रविवार ।
दि. 21 डिसेंबर 2025

## मिशन-PCMC: काळ्या बॅनर्समुळे
# माजी नगरसेवकांच्या अपयशाची चर्चा!
### प्रभाग क्रमांक- 8, इंद्रायणी नगर परिसरातील काळे बॅनर बनले चर्चेत

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज







**नेहमी शांत असलेल्या इंद्रायणीनगर परिसरामध्ये आज सकाळपासूनच झळकलेले काळे फलक चर्चेचा विषय बनले. प्रभाग क्र. ८ मध्ये पहाटेपासून विविध ठिकाणी काळ्या रंगाचे बॅनर्स झळकताना दिसले. या भागातील रखडलेल्या विकास कामांवर या काळ्या फलकांमधून लक्ष वेधण्यात आले. रखडलेली विकास कामे, आधांतरी असलेले विविध प्रकल्प, निधीचा वारेमाप खर्च असा आशय या फलकांमधून झळकत होता. एक प्रकारे माजी नगरसेवकांच्या अपयशाची चर्चा या फलकांमधून होत असल्याचे येथील नागरिकांचे म्हणणे होते.**

### प्रभाग क्रमांक- 8, इंद्रायणी नगर परिसरातील काळे बॅनर बनले चर्चेत
### पहाटे झळकले फलक; महापालिकेने केली कारवाई

पिंपरी चिंचवडमध्ये 2017 मध्ये भाजपची एक हाती सत्ता होती. त्यानंतर प्रशासकीय राजवट लागू झाली. मात्र या राजवटीतही भाजपचेच आजी माजी पदाधिकारी नगरसेवकाच्या अविर्भावात वावरत होते. प्रत्येक कामावर वारेमाप खर्च, सल्लागारांवर उधळपट्टी मनमानी पद्धतीने ठेकेदारांची मर्जी सांभाळणे. यामुळे पालिकेच्या तिजोरीवर एक प्रकारे डल्ला मारण्यात आला. या सर्व कारभाराचे कारनामे प्रभाग क्रमांक आठ मध्ये काळ्या फलकातून समोर आले. त्यामुळे इंद्रायणी नगर प्रभाग क्रमांक 8 मधील हे काळे फलक आज शहरभर चर्चेचा विषय बनले.

या बॅनर्सवर थेट कोणाचंही नाव नसले तरी, त्यातील मजकूर आणि आशयातून सध्याच्या माजी नगरसेवकांच्या कार्यकाळातील अपयशावर स्पष्टपणे बोट दाखवण्यात आले असल्याचे नागरिकांचे म्हणणे होते. विशेषतः 2017 च्या पंचवार्षिक च मुदत संपल्यानंतर लागलेल्या प्रशासकीय काळातही नगरसेवक म्हणून मिरवणाऱ्या भाजप नगरसेवकांचा पाणीपुरवठा, स्वच्छता, ड्रेनेज, वाहतूक आणि मूलभूत सुविधांमध्ये अपयश या बॅनर्सच्या माध्यमातून सूचित केले गेले असल्याचे बोलले जात आहे.

#### फलकांनी दिली बदलाची चाहूल...

स्थानिक नागरिकांच्या मते, प्रभागात झळकलेले काळे फलक हे भाजपच्या अपयशाचे प्रतीक असून, जनतेच्या नाराजीचे प्रतीकात्मक रूप आहे. अनेक नागरिकांनी स्वतःहून चर्चा करत "हे आपल्याच अनुभवांचं प्रतिबिंब आहे" असे मत व्यक्त केले. या बॅनर्समागे नेमकं कोण आहे, याबाबत अधिकृत माहिती नाही, तरी सध्याच्या राजकीय वातावरणात हे बदलाची चाहूल म्हणून पाहिले जात आहे. महानगरपालिकेने या घटनेची तातडीने दखल घेत संबंधित काळे बॅनर्स हटवले. दरम्यान या काळ्या बॅनर्समुळे प्रभाग क्र. ८ मध्ये राजकीय वातावरण तापल्याचे स्पष्ट दिसत आहे,. आगामी काळात याचे राजकीय पडसाद उमटण्याची शक्यता आहे.

## चऱ्होली-काळजेवाडी, ताजणे मळ्यात बिबट्याचे दर्शन
### अनेक पाळीव जनावरे गायब ; नागरिक भीतीच्या छायेत

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**काळजेवाडी-चोविसावाडी आणि ताजणे मळा परिसरातील राहिवासी इमारतींमध्ये गेल्या काही दिवसांपासून बिबट्याचा वावर आढळला आहे. अनेकांना बिबट्या प्रत्यक्ष दिसला. रात्रीच्या वेळी पाळीव प्राण्यांवर हल्ले होत असल्याने या परिसरातील शेतकरी, मजूर आणि नागरिक सध्या भयग्रस्त झाले आहेत.**



काळजेवाडी चोविसावाडी डी. पी. रस्त्याला ऋषिकेश भरत काळजे यांच्या शेतात स्थानिकांना बिबट्या दिसला. मुख्य रस्ता असणाऱ्या एअर पोर्ट रस्त्यावरून जाताना तनिष ऑर्किड सोसायटीच्या समोरील रस्त्याने पुढे गेल्यावर राही कस्तुरी, ग्लोबल सोसायटीच्या परिसरात बिबट्याचा वावर आहे. तनिष ऑर्किडपासून पुढे गेल्यावर हा रस्ता बराचसा निर्मनुष्य आहे आणि तेथे बराच अंधार असतो. या परिसरात उसाची शेती मोठ्या प्रमाणावर आहे. त्यामुळे रात्रीच्या वेळी बिबट्या उसाच्या शेताचा आधार घेऊन आजूबाजूच्या परिसरात फिरत असतो. अनेकांना बिबट्या भिंतीवर आणि झाडावर बसल्याचे दिसले. जनावरे गायब होण्याच्या प्रकारांमुळे भीती जास्त वाढली आहे.

"गेल्या काही दिवसांपासून काळजेवाडी आणि ताजणे मळा परिसरात बिबट्याचा वावर मोठ्या प्रमाणावर वाढल्याचे दिसते. अनेक नागरिकांना प्रत्यक्ष बिबट्याचे दर्शन झाले असून, रात्रीच्या वेळी पाळीव प्राण्यांवर हल्ले होण्याच्या घटनांमध्येही वाढ झाली आहे.
**–सचिन कोतवाल,** काळजेवाडी

"चऱ्होली हा भाग अजूनही काही प्रमाणात शेतीवर अवलंबून आहे. बिबट्याच्या भीतीने मजूर कामावर येण्यास तयार नाहीत. रात्रीच्या वेळी पिकांना पाणी देणे पूर्णपणे बंद झाले आहे. याचा परिणाम उत्पादनावर होण्याची शक्यता आहे.
**–निर्गुण थोरे, चऱ्होली**

"बिबट्यामुळे कोणतीही जीवितहानी होण्यापूर्वी प्रशासनाने यावर कडक पाऊले उचलावीत. वन विभागाने दोन महिन्यांपूर्वीच सर्वेक्षण करायला पाहिजे होते, कारण बिबट्या वारंवार दिसत आहे.
**–सुरेश तापकीर, स्थानिक शेतकरी**

## प्रभाग क्रमांक 8 मध्ये मांडले "विकासाचे व्हिजन"

# अबाल वृद्धांचे आशीर्वाद परिवर्तन घडवणार- तुषार सहाणे

### इंद्रायणीनगर प्रभाग क्रमांक 8 मध्ये नागरिकांच्या गाठीभेटी

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज



**पिंपरी चिंचवड | प्रतिनिधी: प्रभाग क्रमांक 8 इंद्रायणी नगर परिसरात राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे युवा नेते तुषार सहाणे यांनी प्रचाराला सुरुवात केली असून त्यांनी यावेळी जेष्ठ नागरिकांचे आशीर्वाद घेतले.**

या प्रचारादरम्यान त्यांनी इंद्रायणी नगर, तिलक रेसिडेन्सी, सहारा स्वीट, निसर्ग कॉलनी, संजीवनी कॉलनी आणि द्वारका विश्व सोसायटी या भागांमध्ये त्यांनी नागरिकांशी थेट संवाद साधला. विशेषतः आबाल वृद्धांचे आशीर्वाद घेत प्रचार सुरू केल्यामुळे नागरिकांमध्ये सकारात्मक चित्र दिसून आले.

या प्रचारादरम्यान जेष्ठ नागरिक, माता भगिनी तसेच युवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून अनेक वर्षांपासून या भागात उच्चशिक्षित, संस्कारी आणि काम करणारे नेतृत्व म्हणून तुषार सहाणे यांच्याकडे पाहिले जाते. त्यामुळे यावेळी बदल घडवायचा आणि चांगले नेतृत्व या भागातून महापालिकेच्या सभागृहात न्यायचे असा निर्धारच नागरिकांनी केला आहे.

**सतत जनतेच्या सेवेत असल्यामुळे प्रतिसाद**

2017 च्या निवडणुकीत अत्यंत निसटता पराभव झाल्यानंतरही तुषार सहाणे यांनी प्रभागाशी नाळ तोडली नाही. सातत्याने जनसंपर्क ठेवत सामाजिक बांधिलकी जपली. कोरोनाच्या काळात केलेले सामाजिक कार्य आजही नागरिकांच्या लक्षात आहे. त्यामुळे तुषार सहाणे यांना चांगला प्रतिसाद मिळताना दिसत आहे.

> पिंपरी चिंचवड शहरासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांनी रूट लेव्हलला काम केलेले आहे. आज जो सकारात्मक बदल या शहरात दिसतो. तो केवळ अजित पवार यांची दूरदृष्टी आहे.या शहरासाठी त्यांनी खऱ्या अर्थाने पालक म्हणून भूमिका निभावलेली आहे. त्यांच्या संकल्पनेतील शहर घडवण्यासाठी प्रत्येक प्रभागांमध्ये त्यांना सक्षम करणारे राष्ट्रवादीचे उमेदवार निवडून आपल्याला पुन्हा एकदा शहरात राष्ट्रवादी काँग्रेसला उभारी द्यायची आहे. अजित पवार यांच्या माध्यमातून नक्कीच शहर पुन्हा विकासाच्या दिशेने धावेल यात शंका नाही. **–तुषार सहाणे**, युवा उद्योजक

## प्रभागनिहाय अंतिम मतदान केंद्रांची यादी प्रसिद्ध

### मुख्य प्रशासकीय इमारत तसेच आठही क्षेत्रीय कार्यालयांमध्ये यादी प्रसिद्ध

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज



**पिंपरी चिंचवड : पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या तयारीला आता वेग आला आहे. निवडणूक विभागाने राज्य निवडणूक आयोगाच्या नियमांनुसार तयार करण्यात आलेली प्रभागनिहाय अंतिम मतदान केंद्रांची यादी आज, शनिवार (२० डिसेंबर २०२५) रोजी औपचारिकरीत्या प्रसिद्ध करण्यात आली. मतदारांची सोय, सुलभता आणि मतदान प्रक्रियेतील पारदर्शकता वाढविण्यासाठी ही यादी अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे.**

महापालिकेच्या निवडणूक विभागातून प्रसिद्ध माहितीनुसार ही अंतिम यादी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर — www. PCMCINDIA.GOV.IN — उपलब्ध करण्यात आली आहे. डिजिटल माध्यमातून प्रथमच मतदारांना सहजगत्या मतदान केंद्राची माहिती मिळावी, हा उद्देश यामागे असल्याचेही प्रशासनाकडून सांगण्यात आले.

याशिवाय महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीतील निवडणूक विभाग, सर्व निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालये तसेच महापालिकेच्या आठही क्षेत्रीय कार्यालयांमध्येही मतदान केंद्रांची ही यादी सर्वसामान्यांसाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे. यामुळे नागरिकांना आपल्या प्रभागातील मतदान केंद्र ओळखणे सोपे जाईल, अशी अपेक्षा आहे.

मतदानाच्या दिवशी कोणत्याही प्रकारची गर्दी, गोंधळ किंवा मतदारांची गैरसोय होऊ नये यासाठी मतदारांनी आपल्या मतदान केंद्राची आधीपासून खात्री करून घेणे आवश्यक आहे, असे आवाहन निवडणूक विभागाने केले आहे. मतदान केंद्रात बदल झाल्यास किंवा नवीन केंद्रांची सोय झाल्यास त्याबाबतही माहिती या यादीत देण्यात आली आहे. निवडणूक विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार ही अंतिम यादी तयार करण्यात आली असून पुढील टप्प्यांतील निवडणूक प्रक्रियेची अंमलबजावणी याच पार्श्वभूमीवर होणार आहे. मतदानात सुलभता, पारदर्शकता आणि मतदारांना अधिक सोईची व्यवस्था निर्माण करण्यासाठी आवश्यक सर्व नियमांचे पालन करत यादी तयार केली गेली आहे.

महापालिका क्षेत्रातील वाढते लोकसंख्या दाब, नव्याने तयार झालेल्या वसाहती, शहरीकरण आणि वाहतुकीतील अडचणी लक्षात घेऊन मतदान केंद्रांचे पुनर्विन्यास, स्थलांतर तसेच अद्ययावतकरण करण्यात आले असल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे. पूर्वी काही प्रभागांमध्ये मतदारांना लांब पल्ला गाठावा लागत होता. त्यावर उपाय म्हणून शक्य तितकी केंद्रे जवळच्या शाळा, सार्वजनिक इमारती, सामुदायिक सभागृह याठिकाणी स्थलांतरित रण्यात आली आहेत.

मतदार ओळखपत्रांसह मतदार यादीत नाव तपासण्याचे आवाहनही विभागामार्फत करण्यात आले. याकरिता ऑनलाइन सुविधा उपलब्ध असून जनजागृती मोहिमेचाही महापालिका प्रशासनाकडून पुर्ण वेगाने प्रसार सुरू आहे.

**निवडणूक विभागाचा दावा आहे**

ही संपूर्ण व्यायाम मतदारांना सुरक्षित, पारदर्शक आणि सुरळीत मतदान अनुभव प्रदान करण्यासाठी करण्यात आला आहे. गेल्या निवडणुकांत उभ्या राहिलेल्या तांत्रिक, लॉजिस्टिक आणि व्यवस्थापकीय अडचणींवर यंदा लक्ष देत सुधारित योजना आखण्यात आल्या आहेत.

महापालिका निवडणुकीचे औपचारिक वेळापत्रक जवळ येत असून प्रभागनिहाय अंतिम मतदान केंद्रांची यादी प्रसिद्ध झाल्यामुळे निवडणूक प्रक्रियेचा महत्त्वाचा टप्पा पूर्ण झाला आहे. आता निवडणूक साहित्याची व्यवस्था, मतदान पथकांचे प्रशिक्षण, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांची तपासणी आणि सुरक्षा यंत्रणेची तयारी या पुढील प्रक्रियेला गती मिळणार आहे.

## डॉ. डी. वाय. पाटील रुग्णालयातर्फे आयोजित

# आरोग्यजागरउपक्रम "यशस्वी!

### 300 हून अधिक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला; विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याबाबत जागरुकता

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड; महाराष्ट्र राज्य इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरिंग टेक्नॉलॉजी पुणे यांच्या वतीने आरोग्यजागर या विषयावर एक दिवसीय जनजागृती कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांसाठी आरोग्य शिबिर अवयव दान विषयक जनजागृती व्याख्यान तसेच आपत्कालीन वैद्यकीय प्रथमोपचार प्रशिक्षण सत्र घेण्यात आले. या उपक्रमासाठी पिंपरी येथील डी पी यू सुपर स्पेशालिटी रुग्णालय यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाला तीनशेहून अधिक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.घेतले.**

या उपक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करणे आपत्कालीन परिस्थितीत मदत करण्याची तयारी विकसित करणे तसेच अवयव दानाबाबत सामाजिक जाणीव निर्माण करणे हा होता.

कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी संस्थेच्या प्राचार्य डॉ सीमा झगडे तसेच पिंपरी येथील डी पी यू सुपर स्पेशालिटी रुग्णालयातील अवयव दान व प्रत्यारोपण विभागाच्या विभाग प्रमुख व संचालिका डॉ वृषाली पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

हा कार्यक्रम तंत्रशिक्षण संचालनालय महाराष्ट्र शासन मुंबईचे संचालक डॉ विनोद मोहितकर तसेच महाराष्ट्र राज्य इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरिंग टेक्नॉलॉजी व रिसर्च सोसायटी पुणेचे अध्यक्ष आणि तंत्रशिक्षण संचालनालय पुणेचे सहसंचालक डॉ डी व्ही जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला.

अवयव दान जनजागृती व्याख्यानात डॉ वृषाली पाटील यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की अवयव दान ही मानवतावादी आणि जीवनदान करणारी कृती असून यामुळे अनेक रुग्णांचे प्राण वाचू शकतात. मूत्रपिंड यकृत हृदय




फुफ्फुसे नेत्रपटल त्वचा आणि आतडे यांसारख्या अवयवांच्या दानामुळे प्रत्यारोपणाच्या प्रतीक्षेत असणाऱ्या रुग्णांना नवजीवन मिळते. योग्य माहिती कायदेशीर संमती आणि जनजागृतीमुळे समाजात सामाजिक जबाबदारी आणि जीवनमूल्यांची जाणीव वाढते. मृत्यूनंतरही इतरांच्या जीवनात आशेचा प्रकाश देणारा निर्णय म्हणजे अवयव दान असल्याचे त्यांनी नमूद केले.

आपत्कालीन वैद्यकीय प्रथमोपचार प्रशिक्षण सत्रात पिंपरी येथील डॉ डी वाय पाटील वैद्यकीय महाविद्यालयातील सहायक प्राध्यापक डॉ अर्जुन एच यांनी हृदय व फुफ्फुस पुनरुज्जीवन प्रक्रियेचे सखोल प्रशिक्षण दिले. अचानक हृदयविकाराचा झटका आल्यास सुरुवातीच्या काही मिनिटांत दिलेले योग्य प्रथमोपचार जीवन वाचवू शकतात असे त्यांनी सांगितले. प्रशिक्षणादरम्यान छाती दाबण्याची योग्य पद्धत श्वसन देण्याची प्रक्रिया तसेच आपत्कालीन परिस्थिती ओळखण्याबाबत विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष सरावाची संधी देण्यात आली. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास आणि जबाबदारीची भावना निर्माण झाली.

यावेळी प्राचार्य डॉ सीमा झगडे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की हॉटेल व्यवस्थापन आणि केटरिंग क्षेत्रात करिअर करताना विद्यार्थ्यांनी स्वतःच्या आरोग्याकडे लक्ष देणे अत्यंत आवश्यक आहे. व्यावसायिक शिक्षणासोबत सामाजिक जबाबदारीचे भान असणेही तितकेच महत्त्वाचे आहे. अवयव दानाचा संकल्प करणे आणि जीवनरक्षक कौशल्ये आत्मसात करणे ही काळाची गरज आहे. या उपक्रमासाठी डी पी यू सुपर स्पेशालिटी रुग्णालय पिंपरी यांचे मोलाचे सहकार्य लाभल्याबद्दल त्यांनी आभार मानले.

या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांची सविस्तर आरोग्य तपासणी करण्यात आली. यामध्ये हिमोग्लोबिन रक्तातील साखर रक्तदाब हृदय विद्युत तपासणी डोळे कान नाक घसा स्त्रीरोग त्वचारोग तसेच हृदयरोग तपासणीचा समावेश होता. आवश्यक औषधे आणि आरोग्यविषयक मार्गदर्शनही देण्यात आले. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांची आभा कार्ड नोंदणीसुद्धा करण्यात आली.




www.rklgis.org
RKL GALAXY
International School
CBSE Affiliated School | Jain Minority Institution
RKL Galaxy International School
EMPOWERING YOUNG MINDS THROUGH LEARNING
ADMISSION OPEN
FOR THE YEAR 2026-27
NURSERY - STD X
What we Offer?
CBSE Curriculum
Separate Sports Teachers for Indoor & Outdoor Sports
Digital Classrooms with AV Facilities
Skill Development Programs:
Robotics
Dance, Music, Speech & Drama
Entrepreneurship
Focus on Holistic Development
Enroll Now!
Admission open for 2026-27 | Book Your Spot Today!
8698360005 | 9637339988 | Opp. to Alankapuram Society, Wadmukhwadi, Alandi Road, Pune


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046